# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मानखुर्द, गोवंडी (मुंबई) येथील सुशिक्षित बेरोजगारांसाठी कौशल्य विकास व उद्योजकता अंतर्गत सोयीसुविधांचे लाभ प्रत्यार्पित करण्याबाबत**

**(१) २२८४९ (०६-०८-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द, गोवंडी (मुंबई पूर्व उपनगर जिल्हा) या विधानसभा क्षेत्रातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी कौशल्य विकास व उदयोजकता अंतर्गत अल्पसंख्याक बेरोजगार उमेदवारांसाठी आवश्यक त्या सोयीसुविधांचे लाभ प्रत्यार्पित करण्यासाठी विधानसभा क्षेत्रातील सुशिक्षित बेरोजगार तसेच अल्पसंख्यांक तरुणांसाठी त्यांच्या पर्याय रोजगारविषयी स्थानिक जागरुक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी तसेच विविध राजकिय पक्षांचे पदाधिकारी यांनी मा. मंत्री (अल्पसंख्याक विकास) मा. राज्यमंत्री (अल्प संख्याक विकास), जिल्हाधिकारी (मुंबई पूर्व उपनगरे), अल्पसंख्यांक विकास संचानालय आणि जिल्हा अल्पसंख्यांक कौशल्य विकास व उदयोजकता अधिकारी (रोजगार विनिमय) यांच्याकडे तांत्रिक / अतांत्रिक / अर्हताकारी सेवा पदांसाठी माहे जानेवारी, २०१५ वा त्यासुमास लेखी निवेदनाद्वारे शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे काम किती कालावधीत हाती घेण्यात येईल वा येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी माहे मे, २०१५ अखरे पर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-१०-२०१५) :**(१) निवेदन प्राप्त नाही.

(२), (३) व (४) राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील बरोजगार उमेदवारांना रोजगाररक्षम बनविण्यासाठी सन २००८-०९ पासून रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम ही योजना सुरु केली आहे. या योजनेमध्ये संचालक, तंत्रशिक्षण यांच्याकडून अल्पसंख्याक उमेदवारांना अल्पकालावधीसाठी प्रशिक्षण देण्यात येते.

---

**कोकण कृषी विद्यापीठामार्फत मोठ्या प्रमाणात जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत व सदर जमिनी बक्षीसपत्र न करता जमिनीवर शाळा बांधकामे व विहिरी खोदून बांधकामे केल्याबाबत**

**(२) २३०२५ (११-०८-२०१५). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण कृषी विद्यापीठामार्फत मोठ्या प्रमाणात जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत व सदर जमिनी बक्षीसपत्र न करता सदर जमिनीवर शाळा बांधकामे व विहिरी खोदून बांधकामे केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच कृषी विद्यापीठाने जमिनी संपादित केल्या आहेत त्यापैकी काही जमिनी वापराविना पडून आहेत, त्या जमिनी शेतक-यांना परत मिळाव्यात अशी मागणी सातत्याने होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती त्या जमिनी शेतक-यांना परत मिळण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०९-२०१५) :**(१) कोकण कृषि विद्यापीठाकडे एकूण १९५८.०३ हेक्टर जमिन असून कृषि विद्यापीठाच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर अनधिकृत बांधकामे झालेली नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लोहा तालुक्यात (जि.नांदेड) खरीपाच्या हंगामात लोहा बाजारात आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक राज्यातून निकृष्ट दर्जाची बियाणे येत असल्याबाबत**

**(३) २३७५३ (०६-०८-२०१५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा तालुक्यात (जि.नांदेड) खरीपाच्या हंगामात लोहा बाजारात आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक राज्यातून निकृष्ट दर्जाची बियाणे येत असल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारामुळे शेतक-यांची फसवणूक होऊ नये म्हणून शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-११-२०१५) :**(१) अशी घटना निदर्शनास आलेली नाही.

(२) शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून तालुका स्तरावरुन तक्रारी निवारण समिती व भरारी पथक तयार करण्यात येऊन त्यांच्यामार्फत कृषी केंद्रांना भेटी देऊन कृषी सेवा केंद्राची तपासणी करुन बियाणे नमुने काढण्यात आलेले आहेत. काढण्यात आलेल्या नमुन्यापैकी २ कापूस बियाण्याचे नमुने अप्रमाणीत आढळून आलेले आहेत. त्यासंदर्भात संबंधित दुकानदार, बियाणे विक्रेता / उत्पादक यांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आलेला आहे.

(३) कार्यवाही चालू आहे.

---

**भडगाव तालुक्यासाठी कृषि सहाय्यकाच्या पदे रिक्त असल्याने कृषि विभागाच्या विविध योजना व माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यात अनेक अडचणी येत असल्याबाबत**

**(४) २४०१३ (१२-०८-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगाव तालुक्यासाठी कृषि सहाय्यकाच्या २४ मंजूर पदापैकी ९ पदे रिक्त असल्याने कृषि विभागाच्या विविध योजना व माहिती शेतक-यांपर्यंत पोहचविण्यात अनेक अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तसेच रिक्त पदे भरण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-१०-२०१५) :**(१) तालुका कृषी अधिकारी कार्यालय, भडगांव येथील मंजूर असलेल्या एकूण २५ पदांपैकी ९ पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत. सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना देवून कृषि विभागाच्या विविध योजनांचे कामकाज करण्यात येत आहे,

(२) गट क व ड संवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे तातडीने भरण्याविषयी कालबध्द कार्यक्रम आखून त्यानुसार कार्यवाही कार्यान्वित असल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत रोजंदारीवर काम केलेल्या रोजंदारी मजुरांना (मागास प्रवर्ग व खुला प्रवर्ग) गट-क, गट-ड च्या संवर्गातील रिक्त पदावर नोकरीमध्ये सामावून घेण्यात आलेले नसल्याबाबत**

**(५) २४२८५ (०६-०८-२०१५). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत नऊ जिल्हयातील योजना व केंद्रामध्ये सन २००० अखेर गेली १५ ते २० वर्षे रोजंदारीवर काम केलेल्या रोजंदारी मजुरांना (मागास प्रवर्ग व

खुला प्रवर्ग) गट-क, गट-ड च्या संवर्गातील रिक्त पदावर नोकरीमध्ये सामावून घेण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ८६५ रोजंदारी कर्मचाऱ्यांचा सन २००७ अखेरच्या सेवा ज्येष्ठता यादीमध्ये समावेश होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सेवा ज्येष्ठता रोखलेल्या व रिक्त पदावर नोकरींमध्ये न घेतलेल्या कर्मचाऱ्यांनी राहुरी येथील मुख्य कार्यालय व मुख्य प्रवेशद्वार बंद धरणे आंदोलनाबाबत दिनांक ९-२-२०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदय व मा.कृषी मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, रोजंदारी मजुरांची रिक्त पदावर भरती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, रोजंदारी मजूरांची अंतीम सेवा ज्येष्ठता यादी दि.३१.१२.२००० अखेर प्रसिदध करण्यात आली आहे.

(३) होय.

(४) राहूरी कृषि विद्यापीठाने दिलेल्या जाहिरातीनुसार कृषी विद्यापीठात रोजंदारीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची नियमानुसार अर्ज करुन सदर परिक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. रोजंदारीवरील कर्मचारी गट- क गट-ड या पदांसाठी विहित करण्यात आलेली शैक्षणिक अर्हता वयोमर्यादेची अट पूर्ण करत असल्यास व त्यांनी विहित मुदतीत अर्ज केले असल्यास व परिक्षा उत्तीर्ण झाल्यास त्यांच्या निवडीस कोणतीच अडचण नसल्याचे शासन पत्र क्र.मकृवि-२०१२/प्र.क्र.६/६-ओ/सु.धा. दि. ०६.०१.२०१५ अन्वये विद्यापीठाला कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी केंद्रातून शेतकऱ्यांना खते, बियाणे व औषधांच्या होणाऱ्या पुरवठ्यातील काळाबाजार रोखण्याबाबत

**(६) २४५२२ (०८-०९-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी केंद्रातून शेतकऱ्यांना खते, बियाणे व औषधांच्या होणाऱ्या पुरवठ्यातील काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हा परिषद कृषी विभागाने जिल्ह्यात १५ भरारी पथकाची नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पथकाने आतापर्यंत किती व कोणत्या ठिकाणच्या कृषी केंद्राची तपासणी केली आहे व त्यात त्यांना कोणत्या प्रकारच्या त्रुटी आढळून आल्या आहेत,

(३) असल्यास, तपासणीमध्ये भरारी पथकाला कृषी केंद्रात आढळून आलेल्या त्रुटीच्या संदर्भात संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) भरारी पथकाने अहमदनगर जिल्ह्यातील खते बियाणे व किटकनाशके निविष्ठांच्या १४५ कृषी सेवा केंद्राची तपासणी केली .त्यामध्ये त्यांना भाव फलक दर्शनी भागात न लावणे, मासिक विक्री अहवाल नियमितपणे सादर न करणे, विक्री करत असलेल्या निविष्ठांचे उगम प्रमाणपत्र परवान्यामध्ये समाविष्ट न करणे, बिलावर ग्राहाची स्वाक्षरी न घेणे, खतसाठा रजिस्टर मधील अहवाल प्रत्यक्ष साठ्याशी न जुळणे, इत्यादी प्रकारच्या त्रुटी आढळून आल्या आहेत.
(३) तपासणीमध्ये भरारी पथकाला कृषी सेवा केंद्रात आढळून आलेल्या त्रुटींसंदर्भात पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

अ) बियाणे निविष्ठांच्याबाबतीत १ परवाना रद्द व २० प्रकरणात विक्री बंद आदेश देण्यात आलेले आहेत.

ब) रासायनिक खते निविष्ठांच्या बाबतीत १ परवाना रद्द व १२ प्रकरणात विक्री बंद आदेश आणि ३ ठिकाणी माल जप्ती करण्यात आलेली आहे.

क) किटकनाशके निविष्ठांबाबतीत १ परवाना रद्द व ९ प्रकरणात विक्री बंद आदेश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या कृषी विभागाअंतर्गत अनुदानावरील योजनांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(७) २४५९० (११-०८-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या कृषी विभागामार्फत अनुदानावार वितरीत होणा-या बियाणे, खते, अवजारे, पाईप, स्प्रे पंप आदी शेती साहित्याची खरेदी दर करारानुसार (आरसी) जिल्हास्तरावर केली जात असून एम.आय.डी.सी., मार्केटींग फेडरेशन व लघु उद्योग महामंडळ यांच्या मार्फत या साहित्यांचा थेट तालुका कृषी अधिकारी कार्यालयाला पुरवठा करुन नियमानुसार लाभार्थ्यांच्या हिस्स्याची रक्कम या पुरवठादार संस्थांकडे जमा होणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमध्ये साहित्य पुरवठारांना लाभार्थी हिस्सा पोहचलाच नसून तालुका कृषी कार्यालयाच्या यंत्रणेकडून लार्भार्थी हिस्याच्या कोटयवधी रुपयांच्या रक्कमेची वसुली केली गेली परंतु हि रक्कम पुरवठादार महामंडळाकडे भरलीच नसल्याचा प्रकार निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,

(३) सदर गैरव्यवहार शासनाच्या जिल्हा परिषदेच्या कृषी विभागात लाभार्थी हिस्याची रक्कम डिमांड ड्रॉफ्टद्वारे (डीडी) स्वीकारली जाते, मात्र राज्य शासनाच्या कृषी विभागात कृषी कर्मचाऱ्यांकडे रोखीने रकमेचा भरणा करण्याची सवलत आहे. एवढेच नव्हे तर लाभार्थ्याला त्याची रितसर पावतीही दिली जात नाही, एकाच खात्यात दोन वेगवेगळे नियम आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-११-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत शेतकऱ्यांना अनुदानावर कृषी अवजारे, पाईप, स्प्रे पंप इ. कृषी साहित्यांचे वितरण करण्यासाठी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामाडळ (एम.ऍ.आय.डी.सी) या एकमेव शासन मान्य पुरवठादार संस्थेची नियुक्ती केली आहे. बियाण्याचे दर उत्पादक संस्थाकडून निश्चित केले जातात व महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ व राष्ट्रीय बिज निगम या संस्थामार्फत त्यांचा पुरवठा केला जातो. जैविक खतांचा पुरवठा जैविक किड नियंत्रण प्रयोगशाळा, कृषी विद्यापीठे व महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचेमार्फत तर सुक्ष्म मुलद्रवे यांचा पुरवठा महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचेमार्फत करण्यात येतो. त्यानुसार लाभार्थ्यांच्या हिश्याची रक्कम संबंधित पुरवठदार संस्थेकडे विहित लेखा पध्दतीनुसार जमा केली जाते.

(२) हे खरे नाही.

(३) तालुका स्तरावरुन कृषी औजारांना पुरवठा करताना पुरवठादार संस्थेच्या नावे डी.डी. स्विकारण्यात येतात. त्यामुळे पावती देण्यात येत नाही. तथापि, ग्रामस्तरावर वाटप करण्यात येत असलेल्या निविष्ठा/बियाणे/साहित्याचा लाभार्थी हिस्सा क्षेत्रिय कर्मचाऱ्यांकडून वाटपाच्या वेळी जमा करून डी.डी. द्वारे एकत्रितरित्या पुरवठादार संस्थेकडे भरणा करण्यात येतो.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील महाड व माणगांव तालुक्याच्या सीमेवर असणाऱ्या काळ जलविद्युत प्रकल्पाचे काम मागील ११ वर्षापासून चालू असल्याबाबत**

**(८) २५०२४ (११-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील महाड व माणगांव तालुक्याच्या सीमेवर असणाऱ्या काळ जलविद्युत प्रकल्पाचे काम मागील ११ वर्षापासून चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पामुळे बाधित झालेल्या गावातील नागरिकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अद्यापी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत सातत्याने विधानसभेमध्ये विविध आयुधांद्वारे शासनाचे लक्ष वेधूनही अद्यापी कोणतीच कार्यवाही न होण्यामागची कारणे काये आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे,
(३) व (४) काळ जलविद्युत प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन निजामपूर (धोमरी), निजामपूर (परडी), सांदोशी (आढावा) वाघेरी,नाणोरे या पाच गावठाणामध्ये करण्याचे नियोजन आहे. या पाचही गावठाणामध्ये पुनर्वसनाची कामे निम्म्यापेक्षा अधिक पूर्ण झालेली असून, उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठिबक सिंचनापासून पाणलोट विकासांपर्यंत १८ योजनांकरिता केंद्र शासनाकडून देण्यात आलेला निधी खर्च न केल्याबाबत**

**(९) २५०४९ (१७-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठिबक सिंचनापासून पाणलोट विकासांपर्यंत जवळपास १८ योजनांकरिता केंद्र शासनाकडून गेल्या सात वर्षात राज्य शासनाला तब्बल ४ हजार ९४० कोटी रुपये मिळाले असून त्यातील फक्त ३ हजार ५६७ कोटी खर्च केले असून सुमारे १ हजार ३७३ कोटी खर्चाविना पडून आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने वेळेवर निधी खर्च करीत नसल्याने केंद्र शासनाने निधीचा ओघ कमी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०२-२०१६) :**(१) नाही. ठिबक सिंचन, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा व पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत गेल्या सात वर्षात केंद्र शासनाकडून एकूण रु.४६१३.९३ कोटी निधी प्राप्त झाला असून त्यापैकी रु. ४३७२.६७ कोटी निधी खर्च झालेला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिल्लोड तालुक्यात खरीप मोसमात बाजारात विकल्या जाणाऱ्या निकृष्ट दर्जाची बियाणांवर कारवाई करण्याबाबत**

**(१०) २५४०४ (०८-०९-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड तालुक्यात खरीप मोसमात पशूखाद्याच्या आवश्यकतेनुसार नियोजन करुन पेरणी पूर्व बाजारात विकल्या जाणाऱ्या नकली बियाणावर शासनाने कडक कारवाई करावी, असे निर्देश कृषी अधिकाऱ्यांना लोकप्रतिनिधींने दिले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्देशानुसार पशुखाद्यांचे नियोजन करण्याबाबत व निकृष्ट बियाणे विक्री करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२४-११-२०१५) :**(१) हे खरे नाही. तथापि दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक, जिल्हयात आवश्यकतेनुसार वैरण विकास कार्यक्रम हाती घेण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दि.१० सप्टेंबर, २०१५ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) बियाणे अधिनियमातील तरतूदीनुसार निकृष्ट बियाण्यांच्या विक्रीची प्रकरणे आढळल्यास संबंधितांविरुध्द कायदेशीर उचित कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा तालुक्यातील कोटी परिसरात शेततळयातील प्लॅस्टिक कागद चोरीला जात असल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त असल्याबाबत**

**(११) २५९५६ (१७-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा तालुक्यातील कोटी परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी मिळेल अशा प्रकारचा जलस्त्रोत उपलब्ध नसल्यामुळे शेतक-यांनी पाण्यासाठी शेततळी तयार केली आहेत त्यासाठी लागणारा चांगल्या प्रतीचा प्लॅस्टिक कागद वापरला जातो. यासाठी गरीब शेतक-यांना प्लॅस्टीक कागदाच्या खरेदीसाठी साधारणतः .२ लाख रुपये इतका खर्च येतो. परंतु शेततळ्यासाठी प्लॅस्टीक कागद चोरीला जात असल्यामुळे शेतक-यांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे माहे जून, २०१५ दरम्यान समोर आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेततळ्यातील प्लॅस्टीक कागद चोरीला जात असल्यामुळे अनुदान मिळण्यापूर्वीच शेतक-यांना प्लॅस्टीकचा कागद दोनवेळा स्वखर्चाने टाकावा लागला आहे या शेतक-यांना अनुदानही प्राप्त झालेले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने यावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) अद्याप, कोणतीही उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

शेततळयातील प्लॅस्टीक कागदाच्या चोरीबाबत करमाळा पोलिस ठाण्यात कोणताही गुन्हा दाखल नाही, अथवा शेतकऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाल्याबाबत तक्रार दाखल नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत झालेल्या निधीचा खर्च झालेला नसतांना तो खर्च झाल्याचे प्रमाणपत्र शासनाला सादर करुन फसवणूक केल्याबाबत**

**(१२) २६४७७ (११-०८-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संभाजीनगर (जि.औरंगाबाद) येथे राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत आलेल्या निधीचा खर्च झालेला नसताना तो खर्च झाल्याचे प्रमाणपत्र शासनाला सादर करुन फसवणूक केल्याची बाब माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीअंती संबंधीतावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०४-१२-२०१५) :**(१) नाही.

(२), (३), व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकरदन येथे भाडेपट्याचे उल्लंघन केल्याबाबत**

**(१३) २७२०२ (१२-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स.नं.१८४ क्षेत्र हेक्टर ४१ आर जमीन कब्रस्तानचे ७/१२ नोंद असून महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ३० ऑगस्ट, १९७३ भाग - ए पान क्र. ४ अनुक्रमांक २५ व २६ वर कब्रस्तान जुना उस्मानपेठ भोकरदन म्हणून केंद्र असतांना जनाब शब्बीर खॉन इब्राहीम खान यांनी भाडेपट्याचे उल्लंघन करुन नगरपरिषद भोकरदन येथे एज्युकेशन सोसायटीची नमुना नं. ४३ वर नोंद करुन घेतलेली असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वक्फ अधिनियम, १९९५ चे कलम ३ नुसार वक्फ मिळकत हे नेहमी वक्फ राहते त्यात बदल करता येत नाही परंतु सदरच्या जागेवर अल्पसंख्यांक समाजाची शाळा असून त्यामध्ये ७० टक्के विद्यार्थ्यांची संख्या असल्याचे नमुद केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती अलफलाह एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, भोकदन, जि.जालना यांचा भाडे दर माह ठरवून वक्फ अधिनियम, १९९५ चे कलम ५६ नुसार कायदेशीर भाडेपट्टा करुन घेऊन त्यानुसार बांधकाम परवानगी देण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०९-२०१५) :**(१) होय. श्री.शब्बीर इब्राहिम खान, अध्यक्ष यांनी नगर परिषद भोकरदन येथे नमुना नं.४३ वर अलफलाह एज्युकेशन सोसायटीची नोंद घेतल्याचे आढळून आले असून सदर नाव कमी करुन महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या नावाची नोंद घेणेबाबत कार्यवाही करण्यात येत असल्याचे वक्फ मंडळाने कळविले आहे.

(२) होय. अलफलाह एज्युकेशन सोसायटीमध्ये एकूण १४०० विद्यार्थी शिकत असून त्यामध्ये ७०% मुलींची संख्या आहे. वक्फ अधिनियम, १९९५ चे कलम ३ नुसार वक्फ मिळकत ही नेहमी वक्फच राहते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) अलफलाह एज्युकेशन सोसायटीला शाळेसाठी ११ महिन्याच्या भाडेकरारावर जागा देण्यात आली होती. सदर भाडेकराराची मुदत संपलेली असून लिज रुल्स, २०१४ चे कलम ७ नुसार पुढील भाडेकरार करणेबाबत वक्फ मंडळाकडून कार्यवाही सुरु आहे.

---

**घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील अल्पसंख्यांक मुलीच्या वसतिगृहाची इमारत बांधूनही सदर वसतिगृहात अद्याप प्रवेश देण्यात येत नसल्याबाबत**

**(१४) २७४९३ (१२-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनसावंगी तालुक्यात (जि.जालना) येथे अल्पसंख्यांक मुलीच्या वसतिगृहाची इमारत एक वर्षापूर्वी बांधून पूर्ण झाली असून सदर वसतिगृहात अद्याप प्रवेश देण्यात येत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहात मुलींना तातडीने प्रवेश देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :**(१) नाही.

(२) सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली असून आतापर्यंत ४३ विद्यार्थीनीचे प्रवेश निश्चित करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिक कापणी प्रयोग मर्यादित करण्याच्या प्रकल्पास मुदतवाढ देणेबाबत**

**(१५) २८१७२ (१५-१२-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत पीपीपी-आएडी अंतर्गत TOPS तंत्रज्ञानाद्वारे पिक कापणी प्रयोग मर्यादित करण्याच्या प्रकल्पास मुदतवाढ देणेबाबत शासनाने दिनांक २ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पात सन २०१४-२०१५ मध्ये देण्यात आलेल्या पिक कापणी प्रयोगातील सांख्यिकीय माहिती प्रमाणे कोणत्या गोष्टी प्रामुख्याने निदर्शनास आल्या,

(३) असल्यास, सदर सांख्यिकीय माहिती प्रतिमान केंव्हापर्यंत विकसित होऊ शकेल व याचा प्रत्यक्ष उपयोग किती प्रमाणात होणे अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०२-२०१६) :**(१) होय.

(२) सन २०१४-१५ मध्ये राज्यात दुष्काळ सदृष्य परिस्थितीमुळे ज्वारी, बाजरी, कापूस, सोयाबीन या पिकांच्या पीक कापणी प्रयोगाची उत्पादकतेची किमान पातळी असल्याने सदर माहिती प्रतिमान विकसित करण्याकरीता उपयुक्त ठरणार नसल्यामुळे सन २०१५-१६ मध्ये प्रकल्प राबविण्यात मुदत वाढ देण्यात आली.

(३) सदरचा संशोधनात्मक प्रकल्प प्रायोगिक स्वरुपात राबविण्यात येत असल्यामुळे या प्रकल्पांतर्गत प्राप्त होणाऱ्या निष्कषांच्या आधारे पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**उस्मानाबाद जिल्हयात साधारण ११६ पॉली हाऊस असून यात**
**प्रामुख्याने जरबेरा या फुलाची शेती करण्याबाबत**

**(१६) २८१८७ (२७-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात साधारण ११६ पॉली हाउस असून यात प्रामुख्याने जरबेरा या फुलाची शेती केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील मोठ्या प्रमाणात फुल शेती होत असल्यामुळे फुलांची योग्य दरात विक्री होण्यासाठी व बाजारपेठ मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२२-०२-२०१६) :**(१) होय.

(२) कृषि विभागाकडून जिल्हयामध्ये वेळोवेळी कार्यशाळा घेऊन त्यामध्ये बाजारपेठ प्रतिनिधी, व्यापारी व शेतकरी यांचा समन्वय साधून विक्रीसाठी सहाय्य केले जाते.

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान तळेगाव दाभाडे, जि.पुणे या संस्थेद्वारे दि. ०१.०४.२०१४ ते २३.१२.२०१५ या कालावधीत उस्मानाबाद जिल्ह्यातील १६५ शेतकऱ्यांना पॉलीहाऊस मधील फुलशेती व भाजीपाला लागवड, फुलांची प्रतवारी व पॅकींग बाजारपेठांचा अभ्यास व बाजारपेठांची निवड, विक्री व्यवस्थापन याबाबत प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. तसेच लगतच्या लातूर जिल्ह्यात निर्यात सुविधा केंद्रामध्ये पॅक होऊस, प्रिकुलींग व शितगृह इत्यादी सुविधा सर्व शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील मोर्बे प्रकल्प तयार करतांना त्या प्रकल्पाला पुनर्वसन कायदा लागू करण्याबाबत

**(१७) २८२१५ (२७-१०-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील मोर्बे प्रकल्प तयार करतांना त्या प्रकल्पाला पुनर्वसन कायदा लागू करण्यात आला होता हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात प्रकल्पग्रस्तांची एक बैठक उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अलिबाग यांच्यासोबत दिनांक ११ मे, २०१२ रोजी झाली होती हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या बैठकीत कोणत्या मागण्यासंदर्भात चर्चा व कोणते निर्णय घेण्यात आले आहेत,
(४) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) व (४) या बैठकीत प्रकल्पग्रस्तांना दाखले देणे , नागरी सुविधा देणे, भूखंड देणे व सानुग्रह अनुदान देणे या मगाण्यांबाबत चर्चा करण्यात आली . या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांना दाखले देण्यासाठी जून, २०१२ मध्ये शिबीर आयोजित करुन दाखले वाटप करण्यात आले. ४०४ शेतकऱ्यांना व ६३२ बिगर शेतकऱ्यांना भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. तसेच प्रकल्पग्रस्तांना सानुग्रह अनुदानाचे वाटपही करण्यात आलेले आहे. सानुग्रह अनुदान न स्विकारलेल्या प्रकल्पग्रस्तांची रक्कम महसूल अनामतीस जमा आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर, वेल्हे, मावळ, जुन्नर, खेड, आंबेगाव व पुरंदर (जि.पुणे) येथे भात पिकांच्या लागवडीचे ५१ हजार हेक्टर क्षेत्र प्रभावित प्रभावित झाले असून पाण्याअभावी पिकं वाळून गेली असल्याबाबत**

**(१८) २८३७० (१५-०१-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर, वेल्हे, मावळ, जुन्नर, खेड, आंबेगाव व पुरंदर (जि.पुणे) येथे भात पिकांच्या लागवडीचे ५१ हजार हेक्टर क्षेत्र प्रभावित झाले असून पाण्याअभावी पिके वाळून गेली असल्याची बाब माहे ऑक्टोबर ,२०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :**(१) होय. अंशत: खरे आहे.

खरीप हंगाम २०१५ मध्ये पुणे जिल्ह्यातील भोर, वेल्हे, मावळ, जुन्नर, खेड, आंबेगाव, पुरंदर तालुक्यात एकूण ४६००३ हेक्टर क्षेत्रावर भाताची लागवड झालेली होती. जुलै व ऑगस्ट महिन्यातील पावसाच्या दीर्घ खंडामुळे आणि अनियमिततेमुळे भात पिक पिवळे पडत होते. परंतु, सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यातील चांगल्या पावसाने भात पिकास जीवनदान मिळाले.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येवला येथील बसस्थानक आणि आगारव्यवस्थापक निवास्थानासह व्यापारी संकुल बांधण्याबाबत**

**(१९) २८४५० (१३-०१-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला येथील बसस्थानक आणि आगारव्यवस्थापक निवास्थानासह व्यापारी संकुल बांधण्याच्या बी.ओ.टी तत्वावरील कामास शासनाने दिनांक २६ ऑगस्ट २०१४ रोजी मंजुरी देवूनही माहे ऑक्टोंबर २०१५ पर्यंत काम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बसस्थानकाची अत्यंत दुरवस्था झालेली असल्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी या स्थानकाच्या आधुनिकीकरणाचे काम तातडीने हाती घेण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २६ ऑगस्ट २०१४ रोजी शासनाने मंजुरी दिलेले काम तातडीने सुरु करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली,

(४) तसेच बी.ओ.टी. तत्वावर सदर काम न करण्याबाबत शासनाचा विचार असल्यास प्रश्न भाग (१) व (२) मधील कामासाठी शासनस्तरावरून अनुदान मंजूर करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०२-२०१६) :**(१) होय.
(२), (३) व (४) येवला येथील बसस्थानकातील पायाभूत सुविधा सुस्थितीत आहेत. येवला येथील बांधा, वापरा, हस्तांतरीत करा (BOT) बस स्थानकासंदर्भात छोट्या गाळा धारकांची बांधकामे पाडण्याची कारवाई सुरु करण्यात आली होती. त्याचवेळी हिवाळी अधिवेशन-२०१४ मध्ये स्थानिक विधान सभा सदस्य व प्रश्नकर्ते यांनी केलेल्या विनंतीस अनुसरुन सदरील प्रकरणी तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कृषि विद्यापिठाचे विभाजन करण्याचा निर्णय**

**(२०) २८६८३ (१५-०१-२०१६). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषि विद्यापिठाचे विभाजन करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असतां सदर निर्णयास विद्यार्थी आणि अधिकाऱ्यांनी विरोध दर्शविला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कृषि विद्यापिठाचे विभाजन व्हावे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) :**(१), (२) व (३) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला व महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी या विद्यापीठांचा विस्तार लक्षात घेऊन त्यांचे विभाजन करुन स्वतंत्र विद्यापीठ आवश्यक आहे का याची तपासणी करुन शासनास मार्गदर्शन करण्यासाठी दि. १९ ऑगस्ट, २०१३ च्या शासन निर्णयान्वये डॉ.वाय.एस.पी थोरात यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीच्या धुळे येथील दौऱ्यात महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विभाजन करण्यास विद्यार्थ्यांनी विरोध दर्शविला होता. तसेच यासंबंधी महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथे झालेल्या बैठकीत विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी विभाजनास विरोध दर्शविला होता. विदर्भ कृषि विद्यापीठ स्मारक समिती, अमरावती यांनी डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोलाचे विभाजन करु नये अशी मागणी केली आहे.

सदर समितीने शासनास सादर केलेल्या अहवालावर कार्यवाही करण्यासाठी काही आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय बाबींची माहिती घेणे व त्या अनुषंगाने आवश्यक तपशील प्राप्त करण्यासाठी दि.१४.५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये डॉ.वेंकटेश्वरलू कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल शासनांस प्राप्त झाला असून त्यानुसार पुढील कार्यवाही चालू आहे.

---

**राज्य स्तरावर कृषी विद्यापीठ स्थापन करण्याच्या दृष्टीने तयार करण्यांत आलेल्या बृहत आराखड्याबाबत**

**(२१) २८७७४ (१३-०१-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य स्तरावर कृषी विद्यापीठ स्थापन करण्याच्या दृष्टीने शासानाकडून बृहत आराखडा तयार करण्यांत आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये विदर्भासह बुलडाणा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अनुशेष असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनुशेष भरून काढण्यासाठी तसेच बृहत आराखडयाला अनुसरुन बुलडाणा येथे कृषि शिक्षणासाठी उच्च महाविद्यालय सुरु करण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वासणी मध्यम प्रकल्पामधील बोरगाव तळणी या गावाच्या पुनर्वसनाच्या प्रस्तावास विशेष बाब म्हणून मंजुरी देण्याबाबत**

**(२२) २८८९१ (१३-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर मतदार संघातील वासणी मध्यम प्रकल्पामधील बोरगाव तळणी या गावाच्या पुनर्वसनाच्या प्रस्तावास विशेष बाब म्हणून मंजुरी देण्याबाबत स्थानिक विधानसभा सदस्य अचलपूर यांनी शासनास दिनांक १६/१/२०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) वासणी मध्यम प्रकल्पामधील बोरगांव तळणी या गावचे विशेष बाब म्हणून पुनर्वसन करण्यास शासन निर्णय क्र.आरपीए-१०१५/प्र.क्र.७६/र-१ दि-२०/०८/२०१५ नुसार मान्यता दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कृषी अभियांत्रिकी सेवेचे स्वतंत्र श्रेणी निर्माण करण्याबाबत

**(२३) २९०५६ (१३-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या कृषी विभागामध्ये कृषी अभियांत्रिकी सेवेचे स्वतंत्र श्रेणी निर्माण व्हावे यासाठी राज्यातील १६ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी निवेदन पाठविले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी अभियंत्यांना विविध विभागातील सेवा व योजनांमध्ये संधी द्यावी अशी मागणी सदर विद्यार्थी व पदवीधाराकांकडून होत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी अभियंत्यांना विविध विभागातील सेवा व योजनांमध्ये संधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) कृषि विभागातील महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ, गट-ब, गट-ब (कनिष्ठ), कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक या संवर्गातील पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार कृषि अभियांत्रिकी पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना सरळसेवेने स्पर्धा परिक्षेद्वारे नियुक्तीच्या संधी उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील कोदेंगाव येथून येणाऱ्या नाल्याला आलेल्या पुरामुळे नुकसानीचा पंचनामा करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(२४) २९४५० (१५-०१-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील कोदेंगाव येथून येणाऱ्या नाल्याला आलेल्या पुरामुळे टाकळी (भ.) माळेगाव, मानेगाव, वाकोडी, भेंडाळा, पाटणसावंगी परिसरातील नाल्याकाठावरील शेतातील पीके पुराने खरडली गेली. परंतु अद्यापपर्यंत सदर घटनेच्या नुकसानीचा पंचनामा करण्यात आला नसल्यामुळे संबंधित कृषी सहाय्यकाविरुध्द शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला असल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने नुकसानीचा पंचनामा करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

सावनेर (जि.नागपूर) तालुक्यात दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे ६,५०८ हेक्टर क्षेत्रावरील शेतीपिके व फळपिकांचे ३३ टक्क्यापेक्षा अधिक नुकसान झालेले आहे. त्यासंदर्भातील अहवाल शासनाला प्राप्त झालेला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) होय.

(३) बाधित क्षेत्राचा प्रस्ताव कृषी आयुक्तालय कार्यालयाकडून शासनास प्राप्त झालेला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यात पावसाचा खंड पडल्याने सुमारे सोळा हजार हेक्टरवरील पेरण्या वाया गेल्याबाबत

**(२५) २९५७३ (१५-०१-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात पाऊस नसल्याने सुमारे सोळा हजार हेक्टरवरील पेरण्या वाया गेल्या असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :**(१) पावसात खंड पडल्याने, अनियमित व अपूऱ्या पावसामुळे पुणे जिल्ह्यातील १५६६५ हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झालेली आहेत, हे खरे आहे काय.

(२) होय.

(३) खरीप हंगाम २०१५ मध्ये पुणे जिल्ह्यातील ७६ गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आल्याने महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एससीवाय-२०१५/प्र.क्र..३११/ म-७, दिनांक २०/१०/२०१५ अन्वये पुणे जिल्ह्यातील शिरुर, पुरंदर, आंबेगांव व जुन्नर तालुक्यातील ७६ गावांमध्ये दुष्काळदृश्य परिस्थिती जाहिर करुन विविध उपाययोजना जाहिर करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील मराठवाडी, मेंढ, घोटील, उमरकांचन,**
**जिंती येथील धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत**

**(२६) २९६९४ (१८-०१-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांग मराठवाडी, मेंढ, घोटील, उमरकांचन, जिंती येथील धरणग्रस्तांची शासनाने त्यांचे योग्य पुनर्वसन न केल्यास आम्ही जिल्ह्यात तीव्र आंदोलन करु असा इशारा दिला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धरणग्रस्तांच्या योग्य पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०३-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
तथापि, मेंढ, घोटील, उमरकांचन व जिंती येथील १३३२ पैकी १०५३ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. ७३८ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले आहे. ५९४ अंशतः बुडीत झालेले प्रकल्पग्रस्त प्रकल्पस्थळी वर सरकून राहत आहेत. या व्यतिरिक्त २६८ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यापैकी १८४ प्रकल्पग्रस्तांना ९३.३० हेक्टर जमिनीचे वाटप केलेले आहे. उर्वरित क्षेत्रासाठी भुसंपदानाची कार्यवाही सुरु असून, त्यांचे पुनर्वसनाचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर येथील राहूरी येथील महात्मा फुले विद्यापीठाच्या कर्मचारी**
**व अधिकाऱ्यांचे तीन महिन्याचे थकित वेतनाबाबत**

**(२७) २९७६३ (२३-१२-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील राहूरी येथील महात्मा फुले विद्यापीठाच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांचे तीन महिन्याचे वेतन मिळालेले नाही, त्यामुळे येथील कर्मचाऱ्यांनी मोर्चा काढला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांचे थकित वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप उपययोजना केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१६) :**(१) राज्यातील कृषि विद्यापीठांतर्गत अधिकारी व कर्मचारी यांची वेतने देयके साऊ सेवार्थ या संगणकीय प्रणालीद्वारे तयार करण्यात येतात. तसेच जुलै, २०१५ पासून सीएमपी प्रणालीमार्फत कर्मचाऱ्यांचे वेतन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होण्याची प्रक्रीया सुरु झाली. त्याकरीता महात्मा फुले कृषि विद्यापीठातील अधिकारी व व कर्मचारी यांचा राष्ट्रीयकृत बॅकेतील खात्याचा तपशील अद्यावत करण्याबाबत कार्यवाही पूर्ण करणे तसेच प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे जुलै, २०१५ ते सप्टेंबर २०१५ या महिन्याची वेतने देयके कोषागारात सादर करण्यास विलंब झाल्यामुळे त्या महिन्यांचे वेतन वेळेवर झाले नाही. त्यामुळे विद्यापीठ कर्मचाऱ्यांनी वेतन अदायगीबाबत लक्ष वेधण्यासाठी मोर्चा काढून नियंत्रकांची भेट घेतली व वस्तुस्थिती जाणून घेतली.

(२) महात्मा फुले कृषि विद्यापीठाने साऊ सेवार्थ प्रणालीद्वारे वेतन देयक सादर करण्यामध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निराकरण करुन थकीत वेतन ऑक्टोबर, २०१५ मध्ये अदा करण्यात आले आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील विचूंर प्रकाश महामार्गावरील ठेगोडा येथे सटाणा आगार तसेच नंदूरबार, साक्री, नवापूर आगाराच्या जलद बसेस थांबत नसल्याबाबत**

**(२८) २९८४४ (१८-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील विचूंर प्रकाश महामार्गावरील ठेगोडा येथे सटाणा आगार तसेच नंदूरबार, साक्री, नवापूर इ. आगाराच्या जलद बसेस थांबत नाहीत याबाबत ग्रामपंचायतीने वेळोवेळी पत्र देवून तसेच ग्रामस्थांनी ग्रामसभेत बस थांबा मिळणेबाबत ठराव देऊनही बस थांबा मिळत नसल्याने येथील ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील ग्रामस्थांच्या विनंतीवरुन येथे जलद बसेस थांबण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) ठेंगोडा (जि.नाशिक) येथील बस थांब्यावर राज्य परिवहन बसेस थांबवून प्रवाश्यांची चढ-उतार करण्याबाबतच्या सूचना राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावरुन संबंधित आगारांना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार ठेंगोडा बस थांब्यावर राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस थांबविण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील कर्जत व ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, अंबरनाथ व शहापूर तालुक्यातील भात पिकांवर किडीचा प्रादुर्भाव झाल्याबाबत**

**(२९) २९८८३ (१५-०१-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील कर्जत व ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, अंबरनाथ व शहापूर तालुक्यातील भात पिकांवर किडीचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले व तद्‌नुसार तालुक्यातील भात पिकाचे नुकसान होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१६) :**(१), (२) व (३) ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, अंबरनाथ व शहापूर तालुक्यांमध्ये उन व ढगाळ वातावरणमुळे सुरळीतील अळी (बगळ्या), पाने गुंडाळणारी अळी, खोड किडा, करपा या किडरोगाचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला तसेच रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात सुरळीतील अळी व पाने गुंडाळणारी अळी या किडीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला.

या सर्व तालुक्यांमध्ये क्रॉपसॅप प्रकल्पाअंतर्गत भात पिकावरील किडरोगाचे, किडरोग सर्वक्षकांकडून सर्वेक्षण करुन, शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे उपाययोजनांबाबतचे सल्ले देण्यात आले. गावबैठका, ग्रामपंचायतीच्या माहितीफलकावर किडरोग व त्याबाबतच्या उपायोजनांबाबतची माहिती, जम्बो झेरॉक्स, स्थानिक वर्तमानपत्र इत्यादी माध्यमातून शेतकऱ्यांना किडरोग निर्मुलनाबाबत मार्गदर्शन केले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाड (जि.रायगड) येथील रस्त्यांवर प्रचंड खड्डयांने दुर्गम भागातील एस.टी.सेवा बंद होणार असल्याबाबत**

**(३०) २९९८८ (१८-०१-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील रस्त्यांवर खड्डे असल्याने वाहनांचे पार्ट्स तुटू लागल्याने ऐन गणेशोत्सत्वात काही दुर्गम भागातील एस.टी.सेवा बंद होणार असल्याने नागरिकांची गैरसोय होणार असल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती महाड ता, जि.रायगड येथील दुर्गम भागातील एस.टी.सेवा चालू करण्याबाबत तसेच रस्त्यांचे खड्डे बुजविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) खराब रस्त्यांमुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून दुर्गम भागातील कोणतीही बससेवा बंद करण्यात आलेली नाही. तथापि, खराब रस्त्यांची दुरुस्ती करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग व बांधकाम विभाग, रायगड जिल्हा परिषद यांना राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वक्फ बोर्डाच्या ९७ हजार एकर जमिनीपैकी ७० हजार एकर जमिनी सरकारजमा करण्याबाबत**

**(३१) ३००५७ (१२-०१-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वक्फ बोर्डाची सुमारे ९७ हजार एकर जमीन आहे, त्यापैकी ७० हजार एकर जमिनीवर अतिक्रमणे झाली आहेत, त्याच बरोबर या जमिनी कवडीमोल भावाने विकल्या किंवा भाडेतत्वावर दिल्या आहेत, या सर्वच जमिनी ताब्यात घेतल्या जातील असे मा.महसूलमंत्री यांनी जाहिर केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने निर्णय घेवून सदर जमिनी सरकारजमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२४-०२-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. राज्यात वक्फ मंडळाच्या अधिपत्याखाली सुमारे ९७ हजार एकर इतकी जमीन असून त्यापैकी अंदाजे ७०% जमिनीवर अतिक्रमणे झालेली आहेत.
(२) वक्फ मालमत्तेशी संबंधित ज्या प्रकरणांमध्ये अतिक्रमणे झालेली आहेत अशा सर्व प्रकरणांमधील संबंधित वक्फ मालमता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टिने वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींनुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याबाबत वक्फ मंडळाला निदेश देण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अल्पसंख्यांक विभागातर्फे अल्पसंख्यांक प्रवर्गातील विद्यार्थीसाठी राबविण्यात येत असलेल्या शिष्यवृत्ती उत्पन्नाची वार्षिक मर्यादा वाढविल्याबाबत**

**(३२) ३०४४३ (१२-०१-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक विभागातर्फे अल्पसंख्यांक प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या शिष्यवृत्ती उत्पन्नाची वार्षिक मर्यादा अडीच लाखावरुन सहा लाख रुपये करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे मुस्लीम, पारशी, बौध्द, जैन, ख्रिश्चन, शिख या प्रवर्गातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना त्याचा फायदा झाला असला तरी, उत्पन्नाची मर्यादा वाढविण्यात आल्याने लाभार्थ्यांची संख्या वाढली हे खरे आहे काय,
(३) अल्पसंख्यांक विद्यार्थ्याला व्यवसायिक व उच्चशिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती प्रत्येक राज्याचा कोटा निर्धारित केला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, गरिब, प्रामाणिक, आर्थिकदृष्टया वंचित असलेल्या सर्वच अल्पसंख्यांकांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागणार आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार जास्तीत जास्त अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०३-२०१६)** :(१) खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) खरे नाही.
(४) खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) येथील एसटी बसस्थानकांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३३) ३०४६७ (१८-०१-२०१६). अॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) येथील एसटी बसस्थानकांची दुरवस्था झाली असून बस स्थानक परिसर कचऱ्याच्या विळख्यात सापडला असल्याचे तसेच या एसटी बसस्थानकाला फेरीवाल्यांनी विळखा घातला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेखरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव प्रवाशांची गैरसोय होत आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०३-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) बसस्थानकामध्ये फेरीवाल्यांचा वावर नाही. बसस्थानकाबाहेर रेल्वेस्टेशन परिसरात फरीवाले असून सदरची बाब ही कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेच्या हद्दीत येते. बसस्थानकातील कचरा दररोज उचलला जातो तसेच स्थानकांची साफसफाई दररोज खाजगी ठेकेदाराकडून केले जाते. जमा झालेला कचरा कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेमार्फत दररोज उचलला जातो. सद्यस्थितीत बसस्थानक सुस्थितीत असून वाहनतळावर पडलेले खड्डे भरुन घेण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावतीच्या माहुली गावात एस.टी.अपघातात १२ वर्ष वयाच्या मुलीचा झालेला मृत्यु

**(३४) ३०८१७ (२०-०१-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावतीच्या माहुली गावात एस.टी.अपघातात १२ वर्ष वयाच्या मुलीचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक २५/८/२०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटेनत मृत झालेल्या मुलींच्या कुटूंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) सदर अपघातात मृत झालेल्या मुलाच्या कुटूंबियांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिहवन महामंडळातर्फे रु. ३,००,०००/- एवढी रक्कम अपघात नुकसान भरपाई म्हणून देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदूर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यामध्ये भातशेतीवर करपा, पाने गुंडाळणारी अळी, जळे, भुंगेरी या रोगांचा प्रादुर्भाव झाला असल्याबाबत

**(३५) ३१०२५ (१५-०१-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यामध्ये वातावरणाचा विपरित परिणाम होऊन भातशेतीवर करपा, पाने गुंडाळणारी अळी, जळे, भुंगेरी या रोगांचा प्रादुर्भाव झाला असल्याची माहिती दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सदरच्या भागात शासनामार्फत पाहणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार भातशेतीच्या रक्षणासाठी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना शासनामार्फत करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२४-०२-२०१६) :**(१), (२) व (३) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यामध्ये पावसात खंड पडल्यामुळे माहे जुलै, २०१५ मध्ये तालुक्यात निळे, भुंगेरी, पाने गुंडाळणारी अळी, जिवाणूजन्य करपा या किडरोगांचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला.

मालवण तालुक्यामध्ये क्रॉपसॅप प्रकल्पाअंतर्गत ३ किड सर्वेक्षकांद्वारे शेतावर प्रत्यक्ष जाऊन भात पिकावरील किडरोगाचे सर्वेक्षण केले असून, शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे उपाययोजनांबाबतचे सल्ले देण्यात आले आहेत. गावबैठका, ग्रामपंचायतीच्या महितीफलकावर किडरोग व त्याबाबतच्या उपाययोजनांबाबतची माहिती, जम्बो झेरॉक्स, इत्यादि माध्यमातून शेतक-यांना किडरोग निर्मुलनाबाबत मार्गदर्शन केले. ज्याठिकाणी प्रादुर्भावाचे प्रमाण अत्यल्प प्रमाणात आढळून आले, तेथील शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर किटकनाशकांचा पुरवठा करण्यात आला.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील चिखली तालुक्यात हजारो शेतकऱ्यांची सन २०१४ मधील खरीप पिकांच्या विम्याची रक्कम राष्ट्रीयकृत बँकेकडे जमा करण्यात आल्याबाबत**

**(३६) ३१०९१ (१५-०१-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील चिखली तालुक्यात हजारो शेतकऱ्यांची सन २०१४ मधील खरीप पिकांच्या विम्याची रक्कम राष्ट्रीयकृत बँकेकडे जमा करण्यात आली आहे, मात्र बँकांकडून शेतकऱ्यांना वाटप करण्यात येत असलेल्या प्रत्येक बँकेच्या हेक्टरी पिकामध्ये तफावत आढळून येत आहे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ रोजी अथवा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करून येथील शेतकऱ्यांमधील संभ्रम दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१६)** :(१) राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०१४ मध्ये बुलढाणा जिल्हयातील चिखली तालुक्यातील ३३९५४ शेतकऱ्यांनी रु. १.८५ कोटी विमा हप्ता भरुन सहभाग घेतला होता. सहभागी शेतकऱ्यांपैकी ३२८४४ शेतकारी नुकसान भरपाईस पात्र ठरले असून लाभार्थी शेतकऱ्यांना रुपये ११.८७ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे. योजनेच्या तरतूदीनुसार संबंधित अधिसूचित पिकांसाठी अधिसूचित क्षेत्राकरिता हेक्टरी नुकसान भरपाई ही एकसमान असते. त्यामुळे चिखली तालुक्यातील अधिसूचित महसूल मंडळातील पिकांसाठी देण्यात येणाऱ्या हेक्टरी नुकसान भरपाई रकमेमध्ये तफावत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**निमसोड (ता.खटाव) येथे वडूजसाठी स्वतंत्र मुक्कामी गाडी सुरु करण्याबाबत**

**(३७) ३१४१९ (२०-०१-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमसोड (ता.खटाव ) येथे शालेय विद्यार्थी व प्रवाशांच्या सोयीसाठी वडूज आगाराने येथे मुक्कामी गाडी सुरु करावी असे निवेदन ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी मा.आगार प्रमुख वडूज यांना दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर निर्णय घेऊन शासनाने निमसोड येथे वडूजसाठी स्वतंत्र मुक्कामी गाडी सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०२-२०१६) :**(१) होय.

(२) निमसाडे येथील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी दिनांक ०२.०१.२०१५ पासून सातारा-निमसोड-कामथी मुक्कामी फेरी सुरू करण्यात आली आहे. सदरची मुक्काम फेरी दुसऱ्या दिवशी परतीला कामथी-निमसोड-वडुज ०६.१५ वा. निघून निमसोड मार्गे वडूजला परत येते. सदर फेरीचा निमसोड येथील विद्यार्थी लाभ घेत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील टंचाईग्रस्त भागात पाणी चारा याबाबत उपाययोजना करणारा कृती आराखडा तयार करुन त्याची प्रत्यक्ष अंमजबजावणी करण्याबाबत**

**(३८) ३१४२२ (१५-०१-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील टंचाईग्रस्त भागात पाणी चारा याबाबत उपाययोजना करणारा कृती आराखडा तयार ठेवावा, त्याचबरोबर उपाययोजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी अशा सूचना देताना कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केले जातील असा इशारा मा.जिल्हाधिकारी, सातारा यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील टंचाईला आराखडा तयार करुन त्याची प्रत्यक्ष अंमजबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये, म्हणून संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा सन २०१५-१६ तयार करण्यात आलेला आहे. ग्रामीण भागात चारा टंचाई भासू नये म्हणून संभाव्य टंचाईचे काळात उपाययोजना म्हणून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सातारा यांना सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतकऱ्यांसाठी विमा योजना राबविण्याबाबत**

**(३९) ३१५५५ (१५-०१-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन १ कोटी ३७ लाख शेतकऱ्यांचा अपघाती विमा काढणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांसाठी विमा योजना राबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१६) :**(१) व (२) शेतकरी अपघात विमा योजन सन २००५-०६ पासून राबविण्यात येत आहे. राज्यातील १ कोटी ३७ लक्ष शेतकऱ्यांकरीता सन २०१५-१६ साठी दि. १ डिसेंबर, २०१५ ते दि. ३० नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत ही योजना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना या नावाने राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत पूर्वीचे रु. १ लाखचे विमा संरक्षण रु. २ लाख असे करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षिणक, आर्थिक आणि सामाजिक समस्यांबाबत**

**(४०) ३१६३१ (१२-०१-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षिणक, आर्थिक आणि सामाजिक समस्यांबाबत राज्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मा.मुख्यमंत्री यांचेकडे भेट घेऊन मुस्लिमांना शैक्षणिक आरक्षण मिळावे व इतर मागण्यासंदर्भात निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी निवेदनाद्वारे केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, तसेच सदर प्रकरणी मुस्लिमांना शैक्षणीक आरक्षण देण्यात लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०२-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) राज्यातील मुस्लिम समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक व राजकीय विकासासाठी आरक्षण देण्यत यावे, अशी मागणी केली आहे, परंतू शासनाने सामान्य प्रशासन विभाग, दि. ९ जुलै, २०१४ रोजी अध्यादेशाद्वारे मुस्लिम समाजासाठी ५% आरक्षण देण्यात आले होते. याबाबत मा.उच्च न्यायालयाने दि. १४/११/२०१४ रोजी अंतरिम निर्णय दिला असून उपरोक्त अध्यादेश अस्तित्वात असेपर्यंत शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आले आहे. सदर अध्यादेशाचे दि.२३/१२/२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने व्यपगत झाला. या प्रकरणी ॲड. जनरल यांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे. सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात अंतीम निर्णयासाठी प्रलंबित आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाचा अंतीम निर्णय झाल्यावर पुढील आवश्यक ती कार्यवाही करणे योग्य होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटीच्या उत्पन्नात वाढ करण्याबाबत**

**(४१) ३१८१७ (१८-०१-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस.टी.) सन २०१३-१४ च्या संचित तोटा सुमारे १८९९ कोटी आणि सन २०१४ -१५ च्या संचित तोटा सुमारे १९३४ कोटी रुपयांवर गेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तोटा वाढत जाण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, एसटीच्या उत्पन्नात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०२-२०१६) :**(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा सन २०१३-१४ अखेरचा संचित तोटा रु.१२९४.३३ कोटी तर सन २०१४-१५ अखेरचा संचित तोटा रु.१६८५.३४ कोटी आहे.

(२) दर चार वर्षांनी होणारा कामगार, करार, दर सहा महिन्यात महागाई भत्यात होणारी वाढ, भांडार सामुग्री किंमतीत होणारी वाढ, खाजगी व अवैध वाहतूकीत वाढ इ. कारणांमुळे महामंडळाला तोटा होत आहे.
(३) राज्य परिवहन महामंडळाचे भारमान, उत्पनामध्ये वाढ व खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने सुचना प्रसारित करण्यात आलेल्या असून उत्पन्नात वाढ करण्यासाठी प्रवासी वाढवा योजना, नैमित्तिक करारावर देण्यात येणाऱ्या बसेसच्या अटीमध्ये बदल, सक्षम मार्ग तपासणी व अवैध वाहतुकीद्वारे उत्पन्न गळती रोखणे, प्रवासी आकर्षित करण्यासाठी समाजातील २४ विविध घटकांना ५० ते १०० टक्केपर्यंत प्रवास भाड्यात सवलत, वार्षिक सवलत कार्ड, मासिक/ त्रैमासि कार्ड योजनांना व्यापक प्रसिध्दी देऊन प्रवासी व उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करण्यात येत आहे,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड आगारातील प्रवाशांची गैरसोय दूर करणेबाबत

**(४२) ३२५६२ (२०-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड आगारातून रात्री ८ वा. सुटणारी बस माहे जुलै, २०१५ पासून अचानकरित्या बंद केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बस बंद केल्याने सदर परिसरातील नागरिकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रवाशांची गैरसोय दूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिवाकर रावते (०४-०३-२०१६) :**(१) चंदगड बसस्थानकावरून रात्री ०८.०० वा. कोणतीही फेरी चालनात नसल्याने ती बंद करण्याचा प्रश्नच येत नाही. चंदगड आगारातून १९.४५ वा. शेवटचे निर्गम आहे व ते सुरु आहे.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंदगड तालुक्यात (जि.कोल्हापूर) कोवाडहून जादा बस सोडण्याची केलेली मागणी

**(४३) ३२५७६ (२०-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड तालुक्यात (जि.कोल्हापूर) येथील राजगोळी मार्गावर पासधारक विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने कोवाडहून दुपारी १२.०० वाजता जादा बस सोडण्याची मागणी चंदगड आगार प्रमुखांकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी, विद्यार्थी, पालक यांनी माहे जुलै, २०१५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०२-२०१६) :**(१) होय.

(२) चंदगड आगारामार्फत विद्यार्थ्यांच्या सोईकरिता दि.०२.१२.२०१५ पासून कोवाड-राजगोळी मार्गावर कोवाड ते किटवाड १२.०० वाजताची फेरी सुरु करण्यात आली असून चंदगड - कुदनूर फेरी राजगोळीपर्यंत विस्तारीत करण्यात आलेली आहे. या दोन फेऱ्या राजगोळी मार्गावर नविन चालू केल्याने विद्यार्थ्यांची सोय झाली असून सदर सेवेचा विद्यार्थी लाभ घेत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जोडपिंपरी (ता.औढा, जि.हिंगोली) येथील पुनर्वसित गावातील १८ नागरी सुविधाच्या कामांपैकी बहुतांश प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत**

**(४४) ३२६८५ (१६-०१-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोडपिंपरी (ता.औढा, जि.हिंगोली) येथील पुनर्वसित गावातील १८ नागरी सुविधाच्या कामांपैकी बहुतांश प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी मा.लोकप्रतिनिधीनी दिनांक २० जानेवारी, २०१५ अन्वये शासनास लेखी निवेदन दिलेले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, एकूण १८ नागरी सुविधांच्या कामांपैकी किती व कोणकोणती कामे हाती घेण्यात आली आहेत,

(४) असल्यास, प्रलंबित कामे सत्वर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०३-२०१६) :**(१) होय.

(२) १८ नागरी सुविधांपैकी ८ मुलभूत नागरी सुविधा यापूर्वीच पुरविण्यात आलेल्या आहेत.

(३), (४) व (५) पुनर्वसित गावठाणात पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, गटारे, विजपुरवठा, शाळा, ग्रामपंचायत, शौचकुप, पोचरस्ता इ. नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत उर्वरित अनुज्ञेय नागरी सुविधांपैकी दफनभूमी (पोचमार्गासह) आणि गुरासाठी पाण्याचा हौद या नागरी सुविधांची कामे त्वरीत हाती घेण्यात येत असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.

---

**आंद्रा (ता.मावळ, जि.पुणे) धरणग्रस्त संघटनेने आपल्या विविध मागण्यासाठी पंचायतीसमोर धरणे आंदोलन केल्याबाबत**

**(४५) ३२९१० (१६-०१-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंद्रा (ता.मावळा, जि.पुणे) तील धरणग्रस्त संघटनेने आपल्या विविध मागण्यासाठी दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास पंचायतीसमोर धरणे आंदोलन केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना १२/२ च्या नोटीसा देऊनही त्यांना सरकारने पेमेंट केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणासाठी संपादित केलेल्या परंतु अतिरिक्त ठरलेल्या जमिनी मुळ शेतकऱ्यांना परत कराव्यात, आद्राधरणातुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला पाणी देऊ नये आदी मागण्या करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(४) या धरणग्रस्तांच्या मागण्यांबाबत त्वरीत कार्यवाही न झाल्यास आगामी काळात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा आंद्रा धरणग्रस्त संघटनेने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, आंद्रा धरणग्रस्तांच्या मागण्या बाबात शासन स्तरावर कोणता निर्णय झाला आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०२-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

आंद्रा प्रकल्पग्रस्तांनी ८ जानेवारी, २०१५ रोजी असे आंदोलन केले होते.

(२) हे खरे नाही, उप जिल्हाधिकारी, भुसंपादन क्र.१३, पुणे यांचेकडून आंद्रा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे. मात्र काही प्रकरणांमध्ये सहधारकांचे संमतीपत्र सादर नसल्याने ती प्रकरणे प्रलंबित आहेत.

(३) अतिरिक्त ठरलेल्या जमिनी परत द्याव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. तथापि, धरणासाठी अतिरिक्त जमीन संपादीत केल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच आंदोलनकर्त्यांची मागणी पिंपरी चिंचवड महापालिकेला बंद नलिकेतुन पाणी देऊ नये अशी आहे.

(४) व (५) निवेदनकर्त्यांच्या दिनांक ०४ जानेवारी, २०१५ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी पुणे यांचे दालनात बैठक आयोजीत करुन निवेदनकर्त्यांच्या मागण्यांबाबत योग्य ती कार्यवाही करणेबाबत संबंधित अधिका-यांना सुचना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यात पाउस न झाल्याने खरीप हंगामातील बियाणाची नासाडी झाल्याबाबत**

**(४६) ३३०३७ (१५-०१-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात पाउस न झाल्याने खरीप हंगामातील बियाणाची नासाडी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार खरीपाच्या हंगामात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :**(१) होय, अंशत: खरे आहे बियाण्यांची नासाडी झालेली नाही. तथापि, २०१५ च्या खरीप हंगामातील पेरणीनंतर पाऊस कमी पडल्याने पिकांच्या वाढीवर परिणाम होऊन खरीप हंगामातील पिकांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट आली आहे.
(२) होय.
(३) अहमदनगर जिल्ह्यातील खरीप हंगामातील ५८२ गावांपैकी, ५८१ गावांमध्ये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेली आहे. खरीप हंगामातील बाधित क्षेत्राकरीता शासन निर्णय क्र.एससीवाय-१२/२०१५/प्र.क्र.१८७/ म-११, दि.२/१/२०१६ अन्वये रु.२००० कोटी इतका निधी मदत वाटपाकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. मदत वाटपाची कार्यवाही महसूल यंत्रणेमार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाबीज तर्फे गतिमान वैरण विकास कार्यक्रम राबविला जाणार असल्याबाबत**

**(४७) ३३४१२ (१५-०१-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाबीज तर्फे गतिमान वैरण विकास कार्यक्रम राबविला जाणार असल्याचे व राज्यातील २० जिल्ह्यामध्ये ५२ हजार ८०० क्विंटल बियाणे पुरविणार असल्याचे ऑगस्ट, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आजपोवतो किती जिल्ह्यात हा कार्यक्रम राबविला गेला आहे व किती बियाणेचे वाटप करण्यात आले आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) सन २०१५-१६ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रम २८ जिल्ह्यांत राबविण्यात येत असून त्यासाठी महाबीज अकोला यांचेमार्फत दि.१८-०१-२०१६ अखेर ३०२९० क्विंटल चारा पिकांचे बियाणे उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्यापैकी २९,४५१ क्विंटल बियाण्याची शेतक-यांनी प्रत्यक्षात उचल केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्हयातील कृषि विभागात एकूण ६६८ मंजूर कर्मचाऱ्यांच्या पदांपैकी जवळपास १७१ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४८) ३३६१३ (१५-०१-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील कृषि विभागात एकूण ६६८ मंजूर कर्मचाऱ्यांच्या पदांपैकी जवळपास १७१ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या तीन वर्षापासून जालना जिल्हयात दुष्काळा पडलेला असून यावर्षी तर १९७२ पेक्षाही भीषण दुष्काळाची स्थिती जिल्हयात निर्माण झालेली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दुष्काळ निवारणासाठी अनेक सिंचनाची कामे हाती घेतलेली असताना कृषि विभागामार्फत दुष्काळी योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी कृषि विभागाकडे पुरेसे कर्मचारीच उपलब्ध नाहीत हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तदनुसार उक्त पदे तात्काळ भरण्याच्यादृष्टीने शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) जालना जिल्हयात अधिकारी/कर्मचाऱ्यांची एकूण मंजूर पदे ६९२ असून त्यापैकी ५१७ पदे भरलेली आहेत व १७५ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सोपवून काम पार पाडण्यात येत आहे.

महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) या संवर्गातील अधिका-यांची पदे भरण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेप्रमाणे सरळसेवा कोट्यातील ५० पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्याची कार्यवाही कार्यान्वित आहे. तसेच पदांचा आढावा व अद्ययावत जेष्ठता सूची प्रसिध्दीची कार्यवाही झाल्यानंतर सदर संवर्गात पदोन्नतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

गट-क व ड मधील सरळसेवेच्या कोट्यातील रक्त पदे भरणेसंदर्भात अनुक्रमे कृषि आयुक्तालय व विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०१२ मध्ये घेण्यात आलेल्या कृषी सेवा परिक्षा मधील पात्र उमेदवारांपैकी अनेक उमेदवारांनी नियुक्ती न घेतल्याबाबत**

**(४९) ३३७९४ (१५-०१-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०१२ मध्ये घेण्यात आलेल्या कृषी सेवा परिक्षा मधील नियुक्ती देण्यात आलेल्या पात्र उमेदवारांपैकी अनेक उमेदवारांनी नियुक्ती न घेतल्यामुळे सदरची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदावर प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवांराना नियुक्ती देणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केलेली होती हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०१२ मध्ये महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब मध्ये ५९ उमेदवारांची शिफारस करण्यात आली. त्यापैकी ५८ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) मध्ये शिफारस केलेल्या १२० उमेदवारांपैकी ११५ उमेदवारांना नियुक्त देण्यात आली. तथापि, त्यापैकी ५ उमेदवार हे नियुक्तीच्या पदावर हजर झाले नाहीत.
(२) सदर निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील ग्रामीण भागातील हवेली तालुक्यातील वाघोली अथवा उरुळी कांचन येथे शासकीय कृषी महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(५०) ३३८९३ (१५-०१-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये शासकीय कृषी महाविद्यालयांची संख्या मर्यादीत असल्याने खाजगी कृषी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लाखो रुपये वार्षिक फी प्रवेशासाठी भरावे लागत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कृषी महाविद्यालयात प्रवेश घेणारी बहुतांश विद्यार्थी शेतकरी वर्गातील आहेत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यामध्ये शासकीय कृषी महाविद्यालयांची संख्या मर्यादीत असल्याने व विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची ओढ पाहून प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी शासकीय कृषी महाविद्यालये सुरु करण्याची मागणी शासनाकडे होत आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, पुणे जिल्हयामध्ये पुणे शहरात शासकीय कृषी महाविद्यालये सुरु करण्याची मागणी शासनाकडे होत आहे हे खरे आहे काय,

(५) असल्यास, पुणे जिल्हयातील ग्रामीण भागातील हवेली तालुक्यातील वाघोली अथवा उरुळी कांचन येथे शासकीय कृषी महाविद्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१६)** :(१) हे खरे नाही. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी ठरवून दिलेल्या निकषानुसार कृषि महाविद्यालयांकरीता वार्षिक प्रवेश शुल्क आकारण्यात येते.

(२) होय.

(३) होय.

(४) हे खरे नाही.

(५) प्रत्येक जिल्हयात एक शासकीय कृषि महाविद्यालयात स्थापन करण्याचे शासनाचे धोरण आहे. पुणे जिल्हयात शासकीय कृषि महाविद्यालय कार्यरत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.